# मनोगत

माझा जन्म गोव्यातील धावे नामक एका खेड्यातील! घर गावापासून देखील दूर. गावात यायचे तरी दीड-दोन किलोमीटर चालावे लागते. परिसर मांत्र निसर्गसंपन्न! आजूबाजूला पसरलेल्या सुपारीच्या बागा.... नारळाची आणि केळीची झाडे... आणि खालच्या बाजूला असलेली वांयगणी शेती.... या अशा वातावरणांत माझा जन्म झाला आणि बरेच आयुष्य याच भागात व्यतीत झाल्याने ग्रामिणता मी जन्मापासून आनुभवत आलो आहे. मी ग्रामीण भागातील संपन्न निसर्गाचा अनुभव घेतला तसाच गरीबीचा आणि लोकांच्या जगण्यासाठीच्या संघर्षाचा देखील अनुभव घेतला. माझ्या लहानपणी आमच्या कुळागरात आणि शेतात काम करायला येणारे सर्व कामगार काष्टी घालून येणारे म्हणजे फक्त लंगोटी लावून येणारे होते. आमची परिस्थिती चांगली होती म्हणजे आम्हाला जेवणखाण व्यवस्थित मिळत होते. याचे कारण, शेती- कुळागरावर निस्सीम प्रेम करणारे माझे बाबा शिक्षक देखील होते आणि शिक्षणांत अत्यंत हुशार असलेली परंतु परिस्थितीमुळे सातवीच्या पुढे शिकू न शकलेली माझी आई अत्यंत कल्पकतेने संसाराचा गाडा हाकत होती.

अशा ग्रामीण वातावरणांत लहानाचा मोठा झाल्याने जेव्हा ग्रामीण साहित्याशी माझा परिचय झाला तेव्हा मला हे साहित्य आपले वाटू लागले. माझे जगणे देखील या साहित्यातून प्रतिबिंबित होत आहे असे वाटू लागले आणि ग्रामीण साहित्याबद्दलची आपुलकी वाढली व याच विषयात संशोधन करावेसे वाटू लागले व यातूनच माझ्या संशोधनाच्या विषयाचे बीजारोपण झाले आणि मी ‘नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी: एक चिकित्सक अभ्यास’ (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) या विषयावर संशोधन कार्य करण्याचे निश्चित केले आणि तीन वर्षांच्या खडतर मेहनतीनंतर ते कार्य आज पूर्णत्वास जात आहे याचा मला खूप आनंद आहे.

संशोधन करीत असताना सर्वात महत्त्वाचा कोण असतो तर तुमचा मार्गदर्शक, प्रा.डॉ. संजयकुमार करंदीकर यांच्या रुपाने मला देवमाणूस भेटला. मला ज्या ज्या वेळी अडचणी निर्माण झाल्या त्या त्या वेळी सर तत्परतेने माझ्या मदतीला धावून आले. सरांचे मार्गदर्शन आणि कणखर पाठबळ नसते तर एवढ्या कमी वेळात माझे हे संशोधन कार्य पूर्ण होऊच शकले नसते. मी पीएचडी संशोधन बरोडा विद्यापीठातून करीत असलो तरी मी गोवा विद्यापीठात कार्यरत आहे. त्यामुळे या विद्यापीठाने मला जे सहकार्य दिले त्यामुळे माझे संशोधन कार्य सुकर झाले. विशेषतः माझ्या संशोधन कार्यासाठी मला सहा महिन्यांची अभ्यास रजा मंजूर करून दिल्याबद्दल गोवा

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. हरिलाल बी मेनन, कुलसचिव प्रा. डॉ. व्ही.एस्. नाडकर्णी आमच्या भाषा विभागाच्या अधिष्ठात्या डॉ. अनुराधा वागळे यांचे मी आभार मानावेत तेवढे थोडेच. माझ्या या संशोधन कार्यात माझ्या सहकारी प्राध्यापकांनी दिलेले सहकार्य तेवढेच महत्त्वाचे, यात सर्वात प्रथम उल्लेख केला पाहिजे तो डॉ. विनय मडगांवकर यांचा हा माणूस माझ्या मदतीला कायम तत्पर राहिला आहे. त्याचप्रमाणे प्रा. चिन्मय घैसास, प्रा. पूर्वा वस्त, डॉ. हेमंत अय्या व प्रा. जयेश गांवकर यांचे देखील वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. कोंकणी विभागातील डॉ. प्रकाश पर्येकर व माझ्या संशोधन कार्यातील माझ्या प्रगतीबद्दल कायम विचारणा करणारे समाजशास्त्र विभागातील डॉ. अरविंद हळदणकर यांचे ही आभार. मराठीतील एक कवी, समीक्षक आणि प्राचर्य पदाची धुरा सांभाळणारे डॉ. गोविंद काजरेकर यांचे विशेष आभार त्यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य अमूल्य स्वरूपाचे आहे. या ठिकाणी आणखी एक उल्लेख मुद्दामहून केला पाहिजे तो म्हणजे डॉ. अरूणा ढेरे यांचा, मला कुठेही उपलब्ध होत नसलेली पुस्तके त्यांनी मला उपलब्ध करून दिली. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच मला आवडेल.

घरच्यांची साथ नसेल तर कोणतेच कार्य यशस्वी होऊ शकत नाही. मी आज जो काही आहे तो माझ्या आईमुळे आज वयाची पंचात्तरी ओलांडली तरी कुळागरात रमणाऱ्या माझ्या आईमुळेच मी आज या ठिकाणी पोहचू शकलो. तिचा प्रेमळ सहवास मला असच मिळत रहावा ही ईश्वरचरणी प्रार्थना. बाबा लहानपणीच सोडून गेले परंतु ते जिथे असतील तिथून मला आशीर्वाद देत असतील हा विश्वास मला आहे. माझी भावंडे छायाताई, वैभव, प्रज्ञा व सिद्धेश हे माझ्या जगण्यातील अविभाज्य भाग होत, मी माझे संशोधन कार्य पूर्ण करतोय याचा माझ्यापेक्षा त्यांना होणारा आनंद अधिक आहे. पत्नीला अर्धांगी म्हणतात पण सौ. विनया ही माझी सर्वांगी आहे. माझी सगळी काळजी ती घेते म्हणूनच मी हे संशोधन कार्य करू शकलो तसेच माझे दोन्ही मुलगे चि. अथर्व आणि चि. अर्णव हे माझे आधारस्तंभ आहेत.त्यांच्या प्रेमळ सहवासामुळे मी हे संशोधन कार्य आनंदी वातावरणात पूर्णत्वास नेऊ शकलो. माझे सासरे श्री. व्ही.एन्. भिडे व सासू सौ. विद्या भिडे यांचाही मला या ठिकाणी कृतन्यतापूर्वक उल्लेख केलाच पाहिजे. माझा मित्र परिवार तर खूपच मोठा आहे व त्या सर्वांचे पाठबळ मला सतत मिळत असल्याने मी हे कार्य पूर्ण करू शकलो.मला संशोधन कार्यासाठी सतत प्रोत्साहित करणारी माझी धेंपे महाविद्यालयातील सहकारी प्रा. अंजू साखरदांडे, डॉ.वैशाली नाईक डॉ. रोशिदा रॉड्रगीस, प्रा. क्लेरिंडा डायस, प्रा. पांडुरंग नाईक व ‘तुझे संशोधन कार्य तीन वर्षात पूर्ण झालेच पाहिजे’ अशी प्रेमळ धमकी देणाऱ्या मित्रवर्य

डॉ. मनोज इब्रामपूरकर यांचे विशेष आभार! आणि माझे असंख्य आजी-माजी विद्यार्थी.... सरांच्या पीएचडी ची माझ्यापेक्षा त्यांना काळजी जास्त! या विद्यार्थ्यांचा माझ्या प्रतिचा स्नेह असाच कायम राहो हे ईश्वराकडे मागणे.

या सर्वांच्या पाठिंब्यामुळे, सहकार्यामुळे आणि असंख्य शुभेच्छांमुळे मी हे संशोधनाचे कार्य पूर्णत्वास नेत आहे. भविष्यात देखील असे संशोधन कार्य करीत राहण्याची प्रेरणा तो सर्वेश्वर मला देत राहो ही त्याच्याच चरणी प्रार्थना.

दि: **विनायक** उर्फ **विनय लक्ष्मण बापट**